## निशाणी क्र. १४० वरील आदेश

(पारित दिनांक १९/०७/२०२५)

वादीने विलंब माफीसाठी सदरचा अर्ज दिला आहे. वादीने सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र. ३ मंगला विश्वनाथ दाते मयत असल्याचे कळविले आहे. परंतु आजरोजी नि.क्र. १४७ कडे पुरशिस देवुन वादीने असे कळविले आहे की, प्रतिवादी क्र. ३ मंगला ऐवजी प्रतिवादी क्र. ३ विश्वनाथ दाते हे मयत असुन अर्जामध्ये चुकुन मंगला विश्वनाथ दाते असे लिहले गेले आहे. त्याऐवजी विश्वनाथ दाते असे वाचण्यात यावे अशी वादीची विनंती आहे. त्यावरुन वादीचे कथन असे की, प्रतिवादी क्र. ३ विश्वनाथ दाते हे दिनांक २४/०३/२०२० रोजी मयत झाले आहेत. वादी हे भारत सरकार असुन त्यांना प्रतिवादी क्र. ३ च्या मृत्यूची व वारसांची माहिती नव्हती. त्यामुळे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी वादीची विनंती आहे.

०२. प्रतिवादी क्र. ३, ४अे ते ४डी, ५अे/३ व ५डी यांनी सदर अर्जास हरकत घेतली आहे की, वादी शासन आहे म्हणुन त्यांना प्रतिवादीच्या कुटूंबाची माहिती नव्हती हे मान्य करता येणार नाही. तसेच वादींनी विलंबाची संयुक्तीक कारणे दिली नाहीत, त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा, अशी या प्रतिवादींची विनंती आहे.

०३. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. विश्वनाथ दाते यांचा मृत्यूदाखला पाहीला. त्यांचा मृत्यू दिनांक २४/०३/२०२० रोजी झाला आहे. हा अर्ज साडेचार वर्ष विलंबाने दाखल केला आहे. वादींनी हा दावा मिठागराच्या मालकीहक्कासाठी दाखल केला आहे. मिठागराची मालकी प्रतिवादींची आहे असे प्रतिवादींचे कथन आहे. अशा परिस्थितीमध्ये दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्यासाठी प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखावर असणे गरजेचे आहे. शिवाय वादीने केलेला विलंब दंडाची रक्कम देवुन माफ करता येण्यासारखा आहे. सबब आदेश.

## आदेश

१. वादी यांनी सर्व प्रतिवादींना रक्कम रुपये ४००/- (रुपये चारशे मात्र) खर्च म्हणुन देण्याच्या अटीवर विलंब माफ करण्यात येतो.

२. वादीने या आदेशापासुन १५ दिवसांच्या आत रक्कम भरावी.

AMOL ASHOK SHINDE
Digitally signed by AMOL ASHOK SHINDE
Date: 2025.07.21 10:50:48 +0530

**अलिबाग** **(अमोल अ. शिंदे)**

**दिनांकः– १९.०७.२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अलिबाग**